**प्रेसनोट दिनांक ०१/०३/२०१९**

**वारजे माळवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर**

दि.२८/०२/१९ रोजी सांयकाळी ०४.३० वा चे सुमारास महिला नामे सौ कलावती महानप्पा बडगाल रा. गल्ली नं १, शिवाजी बराटे चाळ, कर्वेनगर, पुणे यांनी कर्वेनगर पोलीस चौकी येथे येऊन कळविले की, त्यांचा मुलगा नामे प्रतिमेश बडगगाल वय ४ वर्ष त्यांचे बरोबर खरेदीसाठी विकास चौक, कर्वेनगर, पुणे येथे आला असताना युवराज चपाती सेंटर येथून बेपत्ता झाला आहे.

वगैरे मजकूर सांगितल्याने कर्वेनगर पोलीस चौकीचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक श्री उकिर्डे यांनी तात्काळ मिसिंग झालेल्या मुलाचा फोटो घेऊन चौकी हद्दीत पायी पेट्रोलींग करीत असलेले पो.ना. अरूण किटे, पो.शि. झुंबड, सोनवणे, मासाळ यांना त्यांचे व्हॉटस ॲप वर पाठवून मुलगा हरविला असलेबाबत कळवून चौकी हद्दीत त्याचा शोध घेणेबाबत कळविले. त्यांनी व्हॉटस ॲपवर प्राप्त झालेला मुलाचा फोटो चौकी हद्दीतील त्यांचे ग्रुपवर शेअर करून मिसिंग मुलगा मिळून आल्यास त्याबाबत कळविणेबाबत आवाहन केले. रात्रौ २०.३० वा चे सुमारास त्यांना त्यांचे ओळखीच्या इसमाने फोन करून मिसिंग मुलगा सम्राट अशोक विदयालयाच्या मैदानावर रडत बसला असल्याचे कळविले. त्याप्रमाणे ते सम्राट अशोक विदयालय येथे गेले. रडत असलेल्या मुलाला ताब्यात घेतले. त्याला धीर देऊन त्यास त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्यांचे नाव प्रतिमेश असल्याचे सांगितले. त्यास त्याचे नावा खेरीज इतर कोणतीही माहिती सांगता येत नव्हती. सांयकाळी ०४.३० वा हरविलेला मुलगा हा तोच असल्याची खात्री झाल्याने त्यास चौकीस घेऊन जाऊन त्याची आई सौ. कलावती बडगाल यांच्या ताब्यात सुखरूप दिले आहे. हरविलेल्या मुलाचा ४ तासात शोध घेतल्याने मुलाच्या आईने पोलीसांचे आभार मानले आहेत.

